अपर पोलीस महासंचालक व,
कारागृह व सुधारसेवा, मध्यवर्ती इमारत,
दुसरा मजला, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
दुरध्वनी: क्र.०२०/२६१२५१८०,
फॅक्स नंबर ०२०/२६१२५८७८.
Email I.D. : igoffice.jud-mh@gov.in

---

**परिपत्रक**

**कारागृहातील बंद्यांसाठी कॉईन बॉक्स दूरध्वनी सुविधा सुरु करणेबाबत.**

वाचा:- १) मुख्यालयाचे परिपत्रक क्र. ८४०२/२०१४ दि.६.८.२०१४
२) शासन पत्र क्र जेएलएम-१३१३/प्र.क्र.२९५/तुरुंग-२ दि.१५.१.१५.
३) मुख्यालयाचे परिपत्रक क्र. ३७४३/२०१६ दि. ७.६.२०१६.
४) मुख्यालयाचे परिपत्रक क्र. ३०४२/२०१७ दि.१५.०४.२०१७
५) मुख्यालयाचे परिपत्रक क्र. ३११३/२०१४ दि.३१.३.२०१८

जा.क्र.न्यावि/कॉईन बॉक्स/दुरध्वनी सुविधा/१४११ /२०१९ कक्ष-९(३) पुणे-१ दि.१२.०२.२०१९.

कारागृहातील शिक्षाधिन/न्यायाधिन/पुरुष व महिला बंद्यांसाठी कॉईन बॉक्स दूरध्वनी सुविधा सुरु करणेबाबत वाचा या सदराखालील मुख्यालयाची निर्गमीत वरील परिपत्रके रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१) ज्या पुरुष शिक्षा बंद्यांना नियमित अभिवचन/संचित रजा देय आहे अशा सर्व शिक्षा बंद्यांना दुरध्वनी सुविधेचा लाभ देण्यात यावा.
२) जे पुरुष शिक्षाबंदी शिस्तभंग कारणास्तव खुले कारागृहामधून बंद कारागृहामध्ये दाखल झाल्यानंतर ६ महिने इतका कालावधी कारागृहात व्यतित केल्यानंतर व ज्यांची वर्तणूक समाधानकारक असेल अशा बंद्यांना सदर सुविधा देण्यात यावी.
३) दहशतवादी कारवाया/देशद्रोह/नक्षलवाद/टोळीयुध्द/संघटीत गुन्हेगारी/सराईत गुन्हेगार वगळून इतर ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी कारागृहामध्ये व्यतित केलेल्या व कारागृहातील वर्तणूक समाधानकारक असलेल्या न्यायाधिन पुरुष बंद्यांना दुरध्वनी सुविधा देय राहील.
४) दहशतवादी कारवाया/देशद्रोह/नक्षलवाद/टोळीयुध्द/संघटीत गुन्हेगारी/सराईत गुन्हेगार वगळून ज्या न्यायाधिन पुरुष बंद्यांनी २ वर्षापेक्षा जास्त कालावधी कारागृहात व्यतीत केला आहे व त्यांचे वय ६० वर्षापेक्षा अधिक आहे तसेच त्यांची कारागृहातील वर्तणूक समाधानकारक आहे अशा बंद्यांना सदरची सुविधा देय राहील.
५) तसेच दहशतवादी कारवाया/देशद्रोह/नक्षलवाद/टोळीयुध्द/संघटीत गुन्हेगारी/सराईत गुन्हेगार वगळून ज्या न्यायाधिन बंदीनी २ वर्षापेक्षा जास्त कालावधी कारागृहामध्ये व्यतीत केलेला असून ते अपंग किंवा टि बी/एड्स/कॅन्सर वा इतर गंभिर आजाराने आजारी आहेत, अशा न्यायाधिन पुरुष बंद्यांना सदरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.
६) तसेच ज्या पुरुष बंद्यांना कारागृहीन शिक्षा देण्यात आलेली आहे व शिक्षेच्या दिनांकापासून ६ महिने त्यांची वर्तणूक समाधानकारक असेल अशा न्यायाधिन/शिक्षाधिन पुरुष बंद्यांना सदरची सुविधा देण्यात यावी.

७) दहशतवादी कारवाया/देशद्रोह/नक्षलवाद/टोळीयुध्द/संघटीत गुन्हेगारी/सराईत गुन्हेगार वगळून इतर सर्व महिला बंदी ज्यांची वर्तणूक समाधानकारक आहे अशा महिला बंद्यांना सदरची दुरध्वनी सुविधा देय राहील.

८) दहशतवादी कारवाया/देशद्रोह/नक्षलवाद/टोळीयुध्द/संघटीत गुन्हेगारी/सराईत गुन्हेगार वगळून फाशीच्या बंद्यांना सदर सुविधा देण्यात यावी.

९) सर्व पात्र बंद्यांना महिन्यातून २ वेळा दुरध्वनी सुविधा प्रत्येकी १० मिनिटे उपलब्ध करुन देण्यात यावी.

१०) ज्या बंद्यांना दुरध्वनी सुविधा अनुज्ञेय आहे अशा बंद्यांच्या दुरध्वनी बिलाची वसुली त्यांचे वेतन/खाजगी पैशामधुन करण्यात यावी.

११) ज्या ठिकाणी बीएसएनएल सेवा उपलब्ध नसेल त्या ठिकाणी एमटीएनएल किंवा इतर कार्यरत कंपनीची सुविधा उपलब्ध करुन घेण्यात यावी.

१२) विदेशी बंद्यांना या सुविधेचा लाभ देण्यात येवू नये.

१३) शासन पत्र क्र. जेएलएम/१३१३/प्र.क्र.२९५/तुरुंग-२ दिनांक १५.०१.२०१५ नुसार सदर सुविधेचा गैरवापर होणार नाही या बाबतची खबरदारी घेण्यात यावी तसेच सुविधेच्या गैरवापराबाबत संबंधित कारागृह अधीक्षकांना जबाबदार धरण्यात येईल.

(राजवर्धन)
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे- १.

प्रति,

कारागृह अधीक्षक (सर्व)

प्रत - विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग, मुंबई.
कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व) यांना
२/- आपल्या अधिपत्याखालील कारागृहामध्ये वरील प्रमाणे कार्यवाही संदर्भात विभागीय स्तरावरुन आवश्यक त्या सुचना निर्गमीत करण्यात याव्यात.

Circular.